डॉ. वसंतरावदादा पाटील शेतकरी शिक्षण मंडळ संचलित्
**पद्मभूषण वसंतरावदादा पाटील इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी,**
**बुधगांव. ४१६ ३०४**

**फोन -** ०२३३ (२३६६२४६, २३६६३९७) **फॅक्स -** (०२३३) २३६६१८५ ई-**मेलः** - degreeprincipal@gmail.com,

# नियामक मंडळ सभा वृंत्तात

**वार व दिनांक** : सोमवार, दि.२३/८/२०२१ **वेळ** : दु.१२.३०वा.
**स्थळ** : प्राचार्य कार्यालय

डॉ.वसंतरावदादा पाटील शेतकरी शिक्षण मंडळ, सांगली च्या पदवी विभागाच्या नियामक मंडळाची सभा बुधवार, दि.२३/८/२०२१ रोजी मा.प्राचार्यसो यांचे कार्यालयात बोलविण्यात आली होती. सदर सभेस खालील सदस्यांची उपस्थिती होती.

**उपस्थित सदस्य खालीलप्रमाणे**

| अ.नं. | नांव | पद |
|---|---|---|
| १ | मा. श्री.प्रतापसिंह लच्छारामसिंह रजपूत | अध्यक्ष |
| २ | मा. श्री.नितीनकुमार मधुकर पाटील | सदस्य |
| ३ | मा. श्री.उमेश नामदेव पाटील | सदस्य |
| ४ | मा. श्री.सुरेश तुकाराम गायकवाड | सदस्य |
| ५ | मा. श्री.महादेव शंकर कोरे | सदस्य |
| ६ | सौ.अलौकिका अ. घोरपडे | सदस्य |
| ७ | मा. श्री.मिलिंद दे. खाडीलकर | सदस्य |
| ८ | मा. श्री.दिलीप बाबासो पवार | सदस्य |
| ९ | मा. श्री.आप्पा अ. जाधव | सदस्य |
| १० | मा. श्री.पंकज फडणीस आवटे | सदस्य |
| ११ | डॉ.दिनकर वि. घेवडे | सदस्य सचिव |

वरीलप्रमाणे सर्व सदस्य उपस्थित झालेनंतर मा.अध्यक्षसो यांनी सभेच्या कामकाजास सुरूवात केली. सभेच्या विषय पत्रिकेचे वाचन सदस्य सचिव डॉ.दिनकर वि. घेवडे यांनी पुढीलप्रमाणे केले.

**विषय क्र.१** **मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे**

**ठराव क्र.१** नियामक मंडळाची मागील सभा दि.१७/२/२०२१ रोजी झाली होती सदर सभेचे इतिवृत्त वाचून दाखविण्यात आले. सदरचे इतिवृत्त बरोबर असलेने त्यास सर्वानुमते मंजुरी देवून कायम करणेत आले.

सुचक :– श्री.सुरेश तुकाराम गायकवाड
अनुमोदक :– सौ. अलौकिका अ. घोरपडे
ठराव सर्वानुमते मंजूर.....

**विषय क्र. २. शैक्षणिक वर्ष २०२२.२३ वर्षासाठी अभ्यासक्रम नावांत बदल करणे, प्रवेश क्षमता कमी करणे याबाबत चर्चा करणे.**

**ठराव क्र.** २ महाविद्यालयात सध्या पदवी विभागात एकूण कोर्सेसना् मंजूरी आहे. शैक्षणिक वर्ष २०२२.२३ करीता इलेक्ट्रिकल इंजित्र या कोर्सेस्च्या नावांत पुढीलप्रमाणे इलेक्ट्रिकल इंजि. प्रवेश क्षमता ६० ऐवजी इलेक्ट्रिकल ॲण्ड कॉप्म्युटर इंजि. प्रवेश क्षमता ६० असा बदल करून असे ठरले आहे. तसेच मेकॅनिकल इंजि. अभ्यासक्रमाची प्रवेश पुढीलप्रमाणे मेकॅनिकल इंजि. प्रवेश क्षमता १२० वरून मेकॅनिकल इंजि. प्रवेश क्षमता ६० अशी करावे असे सर्वानुमते ठरविणेत आले. व तसा प्रस्ताव विद्यापीठ, एआयसीटीई, व महाराष्ट्र शासनास सादर करावा असे ठरले.

सुचक :— श्री. मिलिंद दे. खाडीलकर
अनुमोदक :— श्री.नितीनकुमार मधुकर पाटील
ठराव सर्वानुमते मंजूर.....

**विषय क्रं.३ शैक्षणिक वर्ष २०२२.२३ करीता नवीन अभ्यासक्रम सुरू करणेबाबत विचार विनिमय करणे.**

**ठराव क्र.३** विद्यार्थ्यांची व पालकांची तसेच माजी विद्यार्थी यांची मागणी लक्षात घेता महाविद्यालयाचे मेकॅट्रॉनिक्स इंजि. प्रवेश क्षमता ६० हा नवीन अभ्यासक्रमा सुरू करणेबाबत सविस्तर चर्चा करणेत आली व वरील नवीन विषय सुरू करावा व तसा प्रस्ताव विद्यापीठ, एआयसीटीई, व महाराष्ट्र शासनास सादर करावा असे ठरविणेत आले.

सुचक :— श्री. दिलीप बाबासो पवार
अनुमोदक :— श्री.पंकज फडणीस आवटे
ठराव सर्वानुमते मंजूर.....

**विषय क्र. ४. महाविद्यालयात शै. वर्ष २०२२.२३ साठी नविन व्होकेशनल कोर्स सुरू करणेबाबत चर्चा करणे.**

**ठराव क्र.** ४ महाविद्यालयात सध्या पुर्ण क्षमतेचे इंजिनिअरिंगचे कोर्स आहेतच त्यास जोडून कमी कालावधीकरीता व्होकेशन कोर्स घेणेबाबत चर्चा करणेत आली. त्यास अनुसरून पुढीलप्रमाणे कोर्स घ्यावे.

१. ब्लॉक चेन प्रवेश क्षमता ३०  २. डिप्लोमा इन शुगर इंडस्ट्री ॲण्ड प्रोसेसिंग प्रवेश क्षमता ३०

याप्रमाणे वरील व्होकेशनल कोर्स घ्यावेत व तसा प्रस्ताव संबंधीत विभागाकडे पाठविणेत यावा असे ठरविणेत आले.

सुचक :— श्री. आप्पा अ. जाधव
अनुमोदक :— श्री.महादेव शंकर कोरे
ठराव सर्वानुमते मंजूर.....

**विषय क्र.५. आर्थिक वर्ष २०२०.२१ ची ताळेबंद व आर्थिक पत्रके मंजूर करणेबाबत.**

ठराव क्रमांक ५: आर्थिक वर्ष २०२०.२१ ची ताळेबंद व आर्थिक पत्रके महाविद्यालयाचे लेखापरीक्षक कंपनीकडून लेखापरिक्षण करून घेतले आहे. सदरची आर्थिक पत्रके व ताळेबंद वाचून दाखविण्यात आली ती योग्य व बरोबर असलेने त्यास सर्वानूमते मंजूरी देणेत आली.

सुचक :— श्री. मिलिंद दे. खाडीलकर
अनुमोदक :— श्री.पंकज फडणीस आवटे
ठराव सर्वानुमते मंजूर.....

**विषय क्र. ६. :— मा.अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे.**

**ठराव क्रं ६ :—** आयत्या वेळचे विषय नसलेने त्यावर चर्चा होऊ शकली नाही.

सदस्य सचिव
नियामक मंडळ

डॉ. वसंतरावदादा पाटील शेतकरी शिक्षण मंडळ संचलित्
**पद्मभूषण वसंतरावदादा पाटील इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी,**
**बुधगांव. ४१६ ३०४**

**फोन -** ०२३३ (२३६६२४६, २३६६३९७) **फॅक्स -** (०२३३) २३६६१८५ ई-**मेल**: - degreeprincipal@gmail.com,

# नियामक मंडळ सभा वृंत्तात

**वार व दिनांक : शुक्रवार**, दि.२१/१/२०२२ **वेळ** : दु.१२.३०वा.

**स्थळ** : प्राचार्य कार्यालय

डॉ.वसंतरावदादा पाटील शेतकरी शिक्षण मंडळ, सांगली च्या पदवी विभागाच्या नियामक मंडळाची सभा बुधवार, दि.२१/१/२०२२ रोजी मा.प्राचार्यसो यांचे कार्यालयात बोलविण्यात आली होती. सदर सभेस खालील सदस्यांची उपस्थिती होती.

**उपस्थित सदस्य खालीलप्रमाणे**

| अ.नं. | नांव | पद |
|---|---|---|
| १ | मा. श्री.प्रतापसिंह लच्छारामसिंह रजपूत | अध्यक्ष |
| २ | मा. श्री.नितीनकुमार मधुकर पाटील | सदस्य |
| ३ | मा. श्री.उमेश नामदेव पाटील | सदस्य |
| ४ | मा. श्री.सुरेश तुकाराम गायकवाड | सदस्य |
| ५ | मा. श्री.महादेव शंकर कोरे | सदस्य |
| ६ | सौ.अलौकिका अ. घोरपडे | सदस्य |
| ७ | मा. श्री.मिलिंद दे. खाडीलकर | सदस्य |
| ८ | मा. श्री.दिलीप बाबासो पवार | सदस्य |
| ९ | मा. श्री.आप्पा अ. जाधव | सदस्य |
| १० | मा. श्री.पंकज फडणीस आवटे | सदस्य |
| ११ | डॉ.दिनकर वि. घेवडे | सदस्य सचिव |

वरीलप्रमाणे सर्व सदस्य उपस्थित झालेनंतर मा.अध्यक्षसो यांनी सभेच्या कामकाजास सुरूवात केली. सभेच्या विषय पत्रिकेचे वाचन सदस्य सचिव डॉ.दिनकर वि. घेवडे यांनी पुढीलप्रमाणे केले.

**विषय क्रं.१** **मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे**

**ठराव क्र.१** नियामक मंडळाची मागील सभा दि.२३/८/२०२१ रोजी झाली होती सदर सभेचे इतिवृत्त वाचून दाखविण्यात आले. सदरचे इतिवृत्त बरोबर असलेने त्यास सर्वानुमते मंजुरी देवून कायम करणेत आले.

सुचक :– श्री. महादेव शंकर मोरे
अनुमोदक :– श्री. आप्पा अ. जाधव
ठराव सर्वानुमते मंजूर.....

**विषय क्र. २. विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविणेकरीता विचार विनिमय करणे.**

**ठराव क्र. २** विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविणेकरीता समाजातील वेगवेगळया क्षेत्रातील उद्योजक, माजी विद्यार्थी व तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन मिळणेकरीता व्याख्यान आयोजित करणे व विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढविणेकरीता विविध कार्यशाळांचे आयोजन करावे असे सर्वानूमते ठरविणेत आले.

सुचक :– श्री. पंकज फडणीस आवटे
अनुमोदक :– श्री.दिलीप बाबासो पवार
ठराव सर्वानुमते मंजूर.....

**विषय क्रं.३ राष्ट्रीय मुल्यांकन समिती एन.बी.ए यांना करावयाच्या प्रस्तावाबाबत विचार विनिमय करणे.**

**ठराव क्र.३** म्हाविद्यालयातील काही अभ्यासक्रमांना एन.बी.ए मानांकन मिळाले आहे. त्याची मुदत संपत आलेची माहिती घेणेत आली व काही अभ्यासक्रमांना एन.बी.ए मानांकन घेणे आवश्यक आहे. वरील सर्व बाबींचा विचार करून महाविद्यालयातील अभ्यासक्रमांना एनबीए मानांकन घेणेसाठी प्रस्ताव जमा करावा असे ठरविणेत आले.

सुचक :– श्री. सुरेश तुकाराम गायकवाड
अनुमोदक :– श्री.मिलिंद दे. खाडीलकर
ठराव सर्वानुमते मंजूर.....

**विषय क्र. ४. शैक्षणिक कार्याचा आढावाबाबत.**

**ठराव क्र. ४** चालू शैक्षणिक कामकाजाबाबत प्रत्येक विषयाच्या बाबतील विद्यार्थ्यांची मते जाणून घेऊन त्याप्रमाणे सुधारण करणेचे काम सुरू आहे. तसेच महाविद्यालयातर्फे विद्यार्थी व्यतिरिक्त महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी, शिक्षक, पालक व नोकरदार संस्था यांचेकडून अभ्यासक्रमांबाबत मते जाणून घेऊन त्याप्रमाणे विभागीय शैक्षणिक सल्लागार समिती पुढे ठेवण्यात येतात. आणि विभागीय शैक्षणिक सल्लागार समितीच्या मार्गदर्शनानूसार त्या सूचना विद्यापीठातील तत्सम विभागाकडे पाठविल्या जातात. या सुचनेनुसार अभ्यासक्रमामध्ये बदल घडून येतात याची माहिती घेणेत आली.

सुचक :– श्री. नितीनकुमार मधुकर पाटील
अनुमोदक :– श्री. आप्पा अ. जाधव
ठराव सर्वानुमते मंजूर.....

**विषय क्र.५. ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट विभागाकडील कार्याची माहिती घेणे.**

ठराव क्रमांक ५: महाविद्यालयातील शेवटच्या वर्षाच्या विद्यार्थ्यासाठी कॅम्पस् मुलाखतीसाठी वेगवेगळया कंपन्याशी पत्रव्यवहार करून विद्यार्थी शिकत असतानाच विविध कंपन्यामध्ये निवड करणेकरीता महाविद्यालयाचे ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट विभाग कार्यरत आहे त्याची माहिती घेणेत आली. चालू शैक्षणिक वर्षात विविध कंपन्यामध्ये एकूण १८३ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. या शैक्षणिक वर्षात एकूण १६० इतक्या कंपन्या बोलविण्यात आल्या होत्या.

सुचक :– श्री. उमेश नामदेव पाटील
अनुमोदक :– श्री.सुरेश तुकाराम गायकवाड
ठराव सर्वानुमते मंजूर.....

**विषय क्र. ६. :– मा.अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे.**

**ठराव क्रं ६ :–** आयत्या वेळचे विषय नसलेने त्यावर चर्चा होऊ शकली नाही.



सदस्य सचिव
नियामक मंडळ